शैक्षणिक वर्ष २००६-०७ करीता औषधनिर्माणशास्त्र या शाखेचे पदविका अभ्यासक्रम राबविण्यास नवीन संस्थांना मान्यता देण्याबाबत .....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक :- मान्यता-२००६/(१५२/०६)/तांशि-६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- 3 ऑगस्ट, २००६.

संदर्भ :- १. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजत विभाग क्र.३३८२/११८३६/(१९०)/तांशि - १अ, दिनांक २१ मे, १९८३.
२. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र जीईसी २०९७/(१३८/९७)/तांशि-१, दि. १९ ऑगस्ट, १९९८.
३. शासन पत्र क्र. मान्यता २००५/(८८१/०५)/तांशि-६ दि.३ एप्रिल, २००६
४. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १०/एनजीपी/ पदविका प्रस्ताव/२००६/२०९ दि.३० जून,०६ अन्वये सादर झालेला राज्यस्तरीय समितीच्या दि.२७.६.२००६ रोजी झालेल्या बैठकीचा अहवाल
५.शासनाचे पत्र क्र. मान्यता-२००६/ (१२७/०६)/ तांशि-६, दि.१७ जुलै, २००६
६.अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र.एफ.२२- २५४८ /२००६, दि.२७.७.२००६.

**शासन निर्णय :-** सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारितील अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र या शाखांचे पदवीका अभ्यासक्रम राबविण्यासाठी नवीन संस्थांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. उपरोक्त संदर्भ-३ मधील शासन मान्यतेस अनुसरुन तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत देण्यात आलेल्या जाहिरातीसंदर्भात ज्या विविध संस्थांनी सदरहू अभ्यासक्रमांसाठी नवीन संस्था सुरु करण्यासाठी अर्ज केले होते त्या अर्जांची छाननी करुन सदर छाननी अहवाल उपरोक्त संदर्भ -४ मध्ये नमूद केलेल्या राज्यस्तरीय समितीसमोर सादर करण्यात आला होता. या प्रकरणी दि.२७.६.२००६ रोजी झालेल्या राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत नवीन संस्थांबाबत समितीने केलेल्या शिफारशी संदर्भ -५ मधील पत्रानुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आल्या होत्या.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने राज्यस्तरीय समितीच्या शिफारसी विचारात घेऊन संदर्भ - ६ मधील पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार खालीं नमूद केल्याप्रमाणे मातोश्री एज्युकेशन सोसायटी, शिवाजी नगर,मेहकर, जि. बुलढाणा द्वारा संचलित कॉलेज ऑफ फार्मसी, मु. मेहकर, जि. बुलढाणा या संस्थेस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास शासन मान्यता देत आहे.

| अ. क्र. | पदविका अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता | अभ्यासक्रमाचा कालावधी | आवश्यक न्यूनतम शैक्षणिक अर्हता | मान्यतेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | औषधनिर्माणशास्त्र | ६० | २ वर्षे | १०+२ | सन २००६-०७ |

Scanned with CamScanner

निम्न निर्देशित अटी व शर्ती मान्य असल्याबाबतची तथा अन्य औपचारिक बाबींसंबंधात मान्यताप्राप्त संस्थेने ...लक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेशी करारनामा करणे बंधनकारक असून संचालक, तंत्रशिक्षण यांनी संबंधित संस्थांत आवश्यक शिक्षक वर्ग नियुक्त केल्याची व या संस्थांत ग्रंथालय तथा प्रयोगशाळा पूर्णपणे कार्यान्वीत झाल्याची खात्री करावी व त्या नंतर सदर संस्थात प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही करुन शासन मान्यताप्राप्त संस्थांची अद्ययावत यादी तयार करावी.

- उपरोक्त संदर्भ -१ मधील शासन निर्णयान्वये विना अनुदानित तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनने विहीत केलेल्या अटी व शर्ती संबंधित संस्थेस बंधनकारक असतील.
- उपरोक्त संदर्भ -२ मधील शासन निर्णयातील तरतूदीनुसार किमान ५ वर्षे कालावधीसाठी आवश्यक मुदतठेवींची रक्कम संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण यांच्या संयुक्त खात्यात जमा करावी लागेल.
- शासनाने विहीत केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून यापुढे विहीत करण्यात येणा-या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेस करारनामा करावा लागेल.
- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संदर्भाधिन पत्रात व त्या पत्रासोबतच्या प्रपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.
- सदर पदविका अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता आवश्यक राहील.
- सदर संस्थांनी पुढील शैक्षणिक वर्षात फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम-१२ मधिल तरतूदीनुसार फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांची मान्यता घेणे बंधन कारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ.गो.खडपकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये
३. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई.
४. संबंधीत संस्था

प्रत माहितीसाठी

१. अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्पोर्टस कॉम्प्लेक्स, आय.पी. इस्टेट, नवी दिल्ली - ११० ००२.
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल ॲश्युरन्स बिल्डिंग, चर्चगेट, मुंबई - २०.
३. निवड नस्ती / ताशि -६

Scanned with CamScanner

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून विद्यमान पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या नावात/ ट्रस्टच्या नावात बदल, संस्थेच्या पत्त्यात बदल करण्यास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासन मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. मान्यता-२०२१/(प्र.क्र.९०/२१) तांशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २९ जुलै, २०२१.

**संदर्भ :** संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/एनजीपी/ पीसीआय/ २०२१/ ५३४, दि.१३/०७/२०२१.

प्रस्तावना :-

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून विद्यमान पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या नावात/ट्रस्टच्या नावात बदल, संस्थेच्या पत्त्यात बदल करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये विद्यमान पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या नावात/ट्रस्टच्या नावात बदल, संस्थेच्या पत्त्यात बदल करण्यास शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावास शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासुन फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून खालील "प्रपत्र-अ" व प्रपत्र-ब मध्ये नमुद केल्यानुसार औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या नावात/ट्रस्टच्या नावात बदल व औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या पत्त्यात बदल करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

प्रपत्र-अ – विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या नावात/ट्रस्टच्या नावात बदल.

| Sr no | Institute Code | Institute PCI ID | Old name of Institute/ Trust | New name of Institute/ Trust |
|---|---|---|---|---|
| 1 | 1161 | PCI-1929 | Matoshri Education Society's College of Pharmacy, Mehakar, Tal. Mahekar, Dist. Buldhana | Matoshri Education Society's Satyajeet College of Pharmacy, Khandala, Akola Road, Mehkar, Tq. Mehkar, Dist. Buldhana. |
| 2 | 2545 | PCI-1637 | PTSP Mandals Pharmacy College, Manwath, Near Bus Stand On Bypass Highway, Manwath | Shriganesh Ramchandra Katruwar College of Pharmacy, Manwath |
| 3 | 5276 | PCI-1123 | Khandesh Education Society's College of Pharmacy, Near Railway Station, Amalner-425402, Dist. Jalgaon | Khandesh Education Society's Late Shri Pandharinath Chhagansheth Bhandarkar College of D. Pharmacy, Amalner, Dist. Jalgaon. |
| 4 | 5291 | PCI-816 | R.C. Patel Educational Tust, H.R. Patel Institute of Pharmacy, Shirpur | Shirpur Education Society, H.R. Patel Institute of Pharmacy, Shirpur |
| 5 | 6909 | PCI-2655 | Y D Mane Institute Of Pharmacy, Kagal D Pharmacy, Near Alka Sheti Farm, Sangaon Road, Kagal, Dist Kolhapur | Y D Mane Institute of Pharmacy, Kagal |

Scanned with CamScanner

प्रपत्र ब- विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या पत्त्यात बदल.

| Sr no | Institute Code | Institute PCI ID | Institute name | Institute Old Address | Institute New Address |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 4657 | PCI-3724 | Dr. R G Bhoyar Institute of Pharmacy | Nagpur-Wardha Road, Mohnapur, Mohnapur(V), Seloo(M), Wardha(D), Maharashtra(S)-442104 | 123, Nagpur Wardha Road, Survey No. 19-1 and 19-2, Mouza Mohanapur Seloo, Seloo(V), Seloo(M), WARDHA(D), Maharashtra(S)-442104. |
| 2 | 6503 | PCI-2058 | Shree Ambabai Talim Sanstha's Diploma in Pharmacy | Sangli-Miraj Raod, Wanlesswadi, Sangli-Miraj Road, Opposite Kripamayee Hospital, Wanlesswadi, (V), Miraj (M), SANGLI(D), MAHARASHTRA (S)-416414 | SATS Diploma In Pharmacy, Sangli-Miraj Road, Tilak Nagar, Miraj Sangli Road, Miraj (V), Miraj(M), SANGLI(D), MAHARASHTRA (S)-416416 |

२. सदरची मान्यता ज्या संस्थांनी शासनाने विहीत केलेले नोंदणी शुल्क अदा केलेले नाही त्यांना सदर नोंदणी शुल्क संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे भरण्याच्या अटीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०७२९११२३५५६७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Raghunath Katkar

(अ. र. काटकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
३. संबंधीत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. सर्व संबंधित संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
६. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, कम्बाइन्ड काऊन्सिल्स बिल्डिंग, कोटला रोड, एजवान-इ-गालिब मार्ग, नवी दिल्ली-११० ००२.
७. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण भाग), नवी दिल्ली.
८. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई
९. निवड नस्ती/तांशि-५.



Scanned with CamScanner

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्यातील विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी विनाअनुदानित संस्थेत नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, इ. साठी फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या परवानगीस अनुसरुन शासनाची मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

**शासन निर्णय क्र.टीईएम-२०२१/प्र.क्र. ११०/तांशि-४**

मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक: २९ जुलै, २०२१.

वाचा : १) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०२१/५७५, दिनांक ०१/०७/२०२१.

२) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०२१/५८८, दिनांक ०६/०७/२०२१.

३) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०२१/६०९, दिनांक १२/०७/२०२१.

४) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०२१/६१७, दिनांक १३/०७/२०२१.

प्रस्तावना :

संचालक, तंत्रशिक्षण यांनी वर नमूद क्रमांक १ ते ४ येथील पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्यातील विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ. साठी फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या परवानगीस अनुसरुन शासन निर्णय निर्गमित करणे इ.बाबत शासन मान्यता देण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

संचालक, तंत्रशिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सोबतच्या Annexure "A" मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ. साठी फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या परवानगीस अनुसरुन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned with CamScanner

शासन निर्णय :

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून सोबतच्या Annexure "A" मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे विद्यमान कायम विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ.बाबत खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेश क्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) अॅक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत . तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.



Scanned with CamScanner

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲ १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

३. ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये या शासन मान्यतेनुसार अभ्यासक्रमाचा समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश पुढील १० दिवसाच्या आत निर्गमित करावेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०७२९१२१४५८७२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Audumbar
Dharurkar

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
५. संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया,कम्बाइन्ड काऊन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान-इ-गालिब मार्ग, नवी दिल्ली-११० ००२.
७. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११०००१.
८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
९. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
१०.निवड नस्ती/तांशि-४



Scanned with CamScanner

| SR. No. | DTE Code | PCI Code | Institute Name | District Name | Region Name | ProgramName | University Name | Course Name | Intake Approved by Govt. A.Y.2020-21 | Intake Approved by PCI A.Y.2021-22 | Variation | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 125 | 5196 | PCI-815 | H. R. Patel Institute of Pharmaceutical Education & Research ,Shirpur, Dhule | Dhule | Nashik | Master of Pharmacy | Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon | Pharmaceutical Chemistry | 0 | 15 | 15 | New Course |
| 126 | 2553 | PCI-1197 | Latur College of Pharmacy, Gurunathappa Bavage Knowledge City | Latur | Aurangabad | Master of Pharmacy | Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded | Regulatory Affairs | 0 | 15 | 15 | New Course |
| 127 | 5208 | PCI-1772 | Royal College of Pharmacetical Education & Research, Sione, Khrud, Malegaon | Nashik | Nashik | Master of Pharmacy | Savitribai Phule Pune University | Pharmacology | 0 | 3 | 3 | New Course |
| 128 | 5208 | PCI-1772 | Royal College of Pharmacetical Education & Research, Sione, Khrud, Malegaon | Nashik | Nashik | Master of Pharmacy | Savitribai Phule Pune University | Pharmaceutical Quality Assurance | 0 | 6 | 6 | New Course |
| 129 | 5192 | PCI-2137 | SNJB's Shriman Sureshdada Jain College of Pharmacy, Neminagar, Chandwad, Nashik | Nashik | Nashik | Master of Pharmacy | Savitribai Phule Pune University | Regulatory Affairs | 0 | 12 | 12 | New Course |
| 130 | 6375 | PCI-558 | Dr. D.Y. Patil Institute of Pharmaceutical Science & Research, Pimpri, Pune | Pune | Pune | Pharm.D (PB) | Savitribai Phule Pune University | Pharm.D (PB) | 0 | 10 | 10 | New Course |
| 131 | 1161 | PCI-1929 | Matoshri Education Soc.'s Satyajeet College of Pharmacy Khandela Akola Road Mehkar Tq Mehkar Dist Buldhana | Buldhana | Amravati | Bachelor of Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Technological University,Lonere | Pharmacy | 0 | 100 | 100 | B.Pharmcay course in existing D.Pharmacy Institute. |
| 132 | 2543 | PCI-3287 | Aditya Pharmacy College, Beed | Beed | Aurangabad | Master of Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University | Pharmacology | 0 | 15 | 15 | New Course |
| 133 | 2543 | PCI-3287 | Aditya Pharmacy College, Beed | Beed | Aurangabad | Master of Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University | Pharmacognosy | 0 | 15 | 15 | New Course |
| 134 | 2543 | PCI-3287 | Aditya Pharmacy College, Beed | Beed | Aurangabad | Master of Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University | Pharmaceutical Analysis | 0 | 15 | 15 | New Course |
| 135 | 2543 | PCI-3287 | Aditya Pharmacy College, Beed | Beed | Aurangabad | Pharm.D | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University | Pharm.D | 0 | 30 | 30 | New Course |
| 136 | 2543 | PCI-3287 | Aditya Pharmacy College, Beed | Beed | Aurangabad | Pharm.D (PB) | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University | Pharm.D (PB) | 0 | 10 | 10 | New Course |
| 137 | 6396 | PCI-2364 | Swargeeya Sanjibhai Rupjibhai Memorial Trust S.S.R. College of Pharmacy, Silvassa | Silvassa | Pune | Master of Pharmacy | Savitribai Phule Pune University | Pharmaceutical Chemistry | 0 | 6 | 6 | New Course |
| 138 | 6396 | PCI-2364 | Swargeeya Sanjibhai Rupjibhai Memorial Trust S.S.R. College of Pharmacy, Silvassa | Silvassa | Pune | Master of Pharmacy | Savitribai Phule Pune University | Pharmacognosy | 0 | 6 | 6 | New Course |



Scanned with CamScanner